# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 05 December 2024
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: ०५ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज शपथ घेणार आहेत. मुंबईत आझाद मैदानात आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणार्या या समारंभात राज्यपाल सी पी राधाकृष्णन फडणवीस यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या नेत्यांनी काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सत्ता स्थापनेचा दावा केला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह मित्रपक्षांच्या एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र यावेळी सादर करण्यात आलं.

****

झारखंडमधे हेमंत सोरेन सरकारच्या विस्तारित मंत्रीमंडळाच्या सदस्यांचा शपथविधी देखील आज रांची इथं होणार आहे. यावेळी ११ जणांना राज्यपाल संतोषकुमार गंगवार पद आणि गोपनियतेची शपथ देतील. त्यात झारखंड मुक्ती मोर्चाचे चार, काँग्रेसचे चार, तर राष्ट्रीय जनता दलाच्या एका मंत्र्याचा समावेश असेल.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वित्त धोरण समितीची बैठक काल मुंबईत सुरु झाली. उद्या बँकेचं वित्त धोरण जाहीर होणार आहे. बँकेनं फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नसून, तो सहा पूर्णांक पाच टक्क्यावर स्थिर राखला आहे.

****

दरम्यान, रिझर्व्ह बँकेनं युपीआय लाइटची मर्यादा ५०० रुपयांवरुन एक हजार रुपये केली आहे. कोणत्याही वेळेस एकंदर मर्यादा पाच हजार असल्याचं बँकेनं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. या नवीन मर्यादा तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आल्या आहेत.

****

बॉयलर संदर्भातला शंभर वर्षं जुना कायदा रद्द करून, बॉयलर दुरुस्ती विधेयक, २०२४ काल राज्यसभेत मंजूर झालं. या विधेयकाच्या मंजुरीनंतर केंद्र सरकार केंद्रीय बॉयलर मंडळाची स्थापना करू शकणार आहे, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. या विधेयकात बॉयलरमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेसाठी विशेष तरतूद केली आहे.

****

आसाम सरकारने राज्यभरातले सर्व उपाहारगृह, हॉटेल्स तसंच सार्वजनिक कार्यक्रम आणि इतर सामुदायिक ठिकाणी गोमांस पुरवण्यावर आणि खाण्यावर पूर्ण बंदी घातली आहे. राज्याचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांनी काल ही घोषणा केली. राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत गोमांस सेवनावरील विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणांना मंजुरी देण्यात आली आहे.

****

विकास प्रक्रियेत मदत करण्यासाठी जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळानं राज्याला तीन डिसेंबर रोजी नव्यानं कर्ज मंजूर केलं आहे. राज्यातल्या मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या जागतिक बँकेच्या उपक्रमाचा हा भाग आहे. विकासाची संधी निर्माण करणं, खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणं हे याचं उद्दिष्ट आहे. ५० हजार कोटींची राज्याची अर्थव्यवस्था देशातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तरीही राज्याच्या जीडीपीपैकी पन्नास टक्के उत्पादन केवळ सात जिल्ह्यांमध्ये होतं. त्यामुळे राज्यातल्या इतर जिल्ह्यांच्या विकासाच्या गतीमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. या उपक्रमामुळे राज्याच्या सर्व जिल्ह्यात विकासाचं उद्दिष्ट साध्य करायला हातभार लागेल, असं जागतिक बँकेचे भारतातले संचालक ऑगस्ते तॅनो कौम यांनी सांगितलं.

****

बहुप्रतिक्षित वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या सर्वेक्षणाच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. या प्रकल्पामुळे अकोला जिल्ह्यातल्या ८४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, चार नवे सिंचन प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. विदर्भाच्या सहा जिल्ह्यांमधल्या ४१ प्रकल्पांना त्याद्वारे पाणी दिलं जाणार आहे.

****

डीआरआय अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयानं तस्करीच्या एका प्रकरणात सोळा किलो मेफेड्रोन हा अंमली पदार्थ आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त केली. याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. हैद्राबादहून मुंबईला जाणाऱ्या एका बस मधून जाणारे दोन प्रवासी मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी करत असल्याची गुप्त माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यावरुन ही कारवाई करण्यात आली.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाराप इथं काल गोवा बनावटीची बेकायदेशीर दारू वाहतूक केल्याप्रकरणी राज्य उत्पादन शुल्कच्या पथकानं दोघांना ताब्यात घेतलं. त्यांच्याकडून ६१ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातल्या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट आरोग्यसंस्था म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं. केंद्रीय आरोग्य विभागाच्या पथकामार्फत या आरोग्य केंद्राची तपासणी करण्यात आली होती.

****

भारताने पुरषांच्या कनिष्ठ हॉकी स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. ओमान मधल्या मस्कत इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा पाच – तीन असा पराभव केला. भारताने पाचव्यांदा या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे.

****

हवामान विभागाने आज कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशची किनारपट्टी या भागात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

****